# मुलांना व्हील चेअरचे वाटप...

या मुलांचे संगोपन करणाऱ्या आई व वडीलांचे करावे तेवढे कौतुक थोडे आहे. नितीन पाटील यांनी जिल्ह्यातील या मुलांचे साठी दवाखान्यात ने आण करण्यासाठी वाहन व्यवस्था जिल्हा परिषद उपलब्ध करुन देईल असे आश्वासित केले. डॉ. परवेझ ग्रांट यांनी सातारा येथील रुबी मेडिकल सेंटरची एक खाली या मुलांचे निदानासाठी आपण मोफत स्वरुपात देत असून येथे साताराचे डॉक्टर्स व्हिडीओ कॉन्फरन्सींग दूवारे मुलांचे साठी संपर्क करतील व उपचार देतील असे सांगितले. श्री. छ. सौ. दमयंतीराजे भोसले यांनी आपल्या परीवारासाठी लागणारी सर्वती मदत देण्यास आपण इच्चूक आहाते असे सांगितले. कार्यक्रमाचे वेळी रितू छाबरिया यांनी या कार्यक्रमाविषयी उपस्थितांना माहीती देत सातारा पॅटर्न आता आपण इतर जिल्ह्यातही मोठ्या प्रमाणावर राबवणार असून त्यासाठी आमचे फौडेशन करिता जिल्हा परिषदेने केलेले सहकार्य हे मोलाचे आहे. यावेळी या आजारग्रस्त मुलांचे साठी सेवा देणाऱ्या सर्व शिक्षक शिक्षीकांचा सत्कार रितू छाबरिया यांचे हस्ते करण्यात आला. समारंभाचे प्रास्ताविक बन्सी शेठ यांनीकेले.यावेणॅ सचीन कुलकर्णी यांनीही मनोगत व्यक्त केले. बी.आर मेहता यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्नेहल दामले यांनी केले. समारंभास भारती पाटील, डॉ. सुनील नाडकर्णी, संतोष शेलार, विनिता, डॉ. संजय लावंड, रुपेश शेठ आदी मान्यवर उपस्थित होते.